# मुलांसाठी बाइबल
प्रस्तुत

# रहस्यमय स्वप्न आणि दानिएल




लेखक: Edward Hughes
रेखाचित्रकार: Jonathan Hay; Alastair P.
रूपान्तरकार: Mary-Anne S.
अनुवादक: Rev. Shilas Gavit
निर्माता: Bible for Children
www.M1914.org

BFC
PO Box 3
Winnipeg, MB R3C 2G1
Canada



©2026 Bible for Children, Inc.
परवाना □लाइसेंस□□तुम्ही जोपर्यंत ही गोष्ट विकत नाहीत, तोपर्यंत तुम्ही ती कॉपी किंवा मुद्रित करू शकता□




नबुखद्नेस्सर राजाने एक स्वप्न पाहिले, यामुळे तो फारच बैचेन झाला होता. परंतू देवाच्या कृपेने दानिएल त्या स्वप्नाचा अर्थ सांगू शकला होता.




पहिली गोष्ट दानिएलने केली ती म्हणजे, दानिएलने त्या स्वप्नाचे तंतोतंत वर्णन केले, "महाराज, तुम्ही एक मोठ्या पुतळ्याची प्रतिमा पाहिली, त्याचे स्वरुप विक्राळ होते!"
3
दानिएलने पुढे म्हटले, "त्या पुतळ्याचे डोके उत्तम सोन्याचे होते."
4
"त्याची छाती व हात चांदीचे होते."
5
"त्याचे पोट व मांड्या पितळेच्या होत्या."
6
"त्याचे पाय लोखंडाचे व त्याच्या पावलांचा काही भाग लोखंडाचा व काही मातीचा होता."
7
राजाला पुतळ्याचे वर्णन सांगितल्या नंतर, दानिएलने त्याच्या पुढचे स्वप्न देखिल सांगितले.
8


दानिएल राजास म्हणाला, "आपण स्वप्न पाहात असतां, कोणाचा हात न लागता, एक पाषाण आपोआप सुटला."
9
"तो पाषाण त्या पुतळ्याच्या लोखंडी व मातीच्या पावलांवर आदळून त्यांचे फुटून तुकडेतुकडे झाले."
10
"तेंव्हा त्या पुतळ्याचा भुगा झाला आणि तो भुगा वाऱ्याने उडवून नेला." दानिएल थोडावेळ थांबला. "त्या पुतळ्यांवर आदळलेल्या पाषाणाचा एक मोठा पर्वत होऊन त्याने सर्व पृथ्वी व्यापिली."
11
राजाला आश्चर्य वाटले. राजाने पाहिलेले स्वप्न दानिएलने तंतोतंत सागितले होते ! दानिएलला ते कसे माहित असावे? केवळ देवाने ते दानिएलला कळविले होते. स्वप्नाचा अर्थ काय आहे हे दानिएल राजाला सांगू लागला.
12
दानिएलाने राजाला म्हटले, "महाराज, आपल्याला स्वर्गीय देवाने राज्य, पराक्रम, बल व वैभव ही दिली आहेत. आपणच उत्तम सोन्याचे डोके आहात."
13
दानिएलने राजाला सांगितले की त्याच्या सोनेरी राज्याचा अंत होईल. पुतळ्यातील चांदीचा भाग म्हणजे त्यानंतर आपल्याहून कनिष्ठ असे राज्य उत्पन्न होईल. आणि पितळेचे असे तिसरे राज्य होईल. आणि लोखंड व माती हे चौथ्या राज्याचे प्रतिक आहेत.
१ ले राज्य
२ रे राज्य
३ रे राज्य
४ थे राज्य
14

शेवटची गोष्ट दानिएलाने राजाला सांगितली ती हि, "स्वर्गीय देव एका राज्याची स्थापना करील, त्याचा कधी भंग होणार नाही."



15

स्वप्न जाणून घेण्याचे आणि त्याला समजून घेण्याचे ज्ञान केवळ परमेश्वरच देऊ शकतो हे राजाला समजून आले होते. नबुखद्नेस्सर राजाने दानिएलला मोठमोठी इनामें देऊन त्याच्या राज्यात दानिएलला फार महत्वाचा व्यक्ति बनविले.



16



१ ले, २ रे, आणि ३ रे राज्ये आली आणि गेली. ४ थ्या राज्यानंतर देवाचे राज्य येते. सर्व जगावर मसिहा राज्य करील. आणि ते लवकरच घडेल !

17

रहस्यमय स्वप्न आणि दानिएल

परमेश्वराची वाणी बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

दानिएल २

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

18




32 60

19

बाइबलमधील ही गोष्ट आम्हांला आमच्या सुंदर परमेश्वराविषयी सांगते ज्याने आम्हांला बनविले आणि ज्याची अशी इच्छा आहे की आम्ही त्याला ओळखावे

परमेश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मरण आहे, पण परमेश्वर तुमच्यावर इतके प्रेम करतो की त्याला तुमच्या पापांची शिक्षा मिळावी आणि वधस्तंभावर मरावे म्हणून त्याच्या एकुलता एक पुत्र येशू याला पाठविले. नंतर येशू जिवंत झाला आणि स्वर्गातील घरी गेला. जर तुम्ही येशूमध्ये विश्वास ठेवता आणि तुमच्या पापांसाठी त्याने क्षमा करावी अशी त्याला विनंती करता, तर तो नक्की क्षमा करील. तो आता तुमच्याबरोबर येऊन राहील आणि तुम्ही त्याच्याबरोबर कायम राहणार.

हे सत्य आहे यावर जर तुम्ही विश्वास ठेवता, तर परमेश्वराला हे सांगाः
प्रिय येशू, तू परमेश्वर आहेस आणि माझ्या पापांसाठी मरण पावण्यास मनुष्य बनला आणि आता तू जिवंत आहे यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांची मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल, आणि एके दिवस मी कायम तुझ्याबरोबर राहण्यासाठी
येईन. तुझी आज्ञा पाळण्यासाठी आणि तुझे मूल होऊन जगण्यासाठी मला मदत कर. आमेन.

बाइबल वाचा आणि परमेश्वराशी रोज बोला! योहान 3:16

20